लोकमत

# ‘कॉमिक’द्वारे ‘सायबर सुरक्षित भारता’चा संदेश

## अभियांत्रिकीच्या सायबर शक्ती क्लबचा उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कराड :** स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून नागरिकांना वाढत्या सायबर गुन्ह्यांपासून सावध करण्यासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड च्या ‘सायबर शक्ती क्लब’तर्फे अभिनव सायबर जनजागृती अभियान राबविण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या सायबर विभागाच्या आणि क्विक फाउंडेशनच्या सहकार्याने आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी कॉमिक पुस्तिका, पोस्टर्स आणि भूमिकांच्या माध्यमातून सायबर सुरक्षेचा संदेश प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविला. यावेळी डॉ. एस. के. पाटील, प्रा. भागवत पाटील, डॉ. आळसुंदकर, डॉ. उमेश देशपांडे, प्रा. उमा पाटील, विभागप्रमुख प्रा. सुनील पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



कराडच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात ‘सायबर शक्ती क्लब’तर्फे अभिनव सायबर जनजागृती अभियान राबविण्यात आले. छाया : संतोष गुरव

### सोशल मीडियावरील संशयास्पद संदेशांपासून तुम्ही सावध राहा...

अनोळखी लिंकवर क्लिक करू नका. ओटीपी, पासवर्ड आणि बँकिंग माहिती कोणालाही देऊ नका. अनोळखी कॉलवरून आलेल्या सूचनांवर तातडीने विश्वास ठेवू नका. सोशल मीडियावरील संशयास्पद संदेशांपासून सावध राहा. ऑनलाइन व्यवहार करताना अधिकृत संकेतस्थळे व ॲपच वापरा. ‘डिजिटल अरेस्ट’ सारख्या फसवणुकीला बळी पडू नका. कोणत्याही संशयास्पद व्यवहाराची तातडीने माहिती द्या.

जाहीर इशारा नोटीस

मौजे अपशिंगे, ता. कोरेगाव, जि. सातारा येथील तसेच पंचक्रोशीतील खरेदीदार, बँका, वित्तीय संस्था व तमाम जनतेस या जाहीर इशारा नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

मौजे अपशिंगे, ता. कोरेगाव, जि. सातारा येथील गट क्र. 511 ही शेतजमीन आमचे अशील रामराव प्रल्हाद माने व कृष्णात प्रल्हाद माने, रा. अपशिंगे, ता. कोरेगाव, जि. सातारा यांच्या